**<u>मासेमारी साधनांवर अनुदान</u>**
**नायलॉन सुताच्या व मोनो फिलेमेंटच्या**
**तयार जाळयांवर अनुदान.**

**महाराष्ट्र शासन**
**कषि व सहकार विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः-मत्स्यवि-११८५/४९५२०/प्र.क्र.१३८/पदुम-१४**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**
**दिनांकः- २६ ऑक्टोबर,१९८७.**

<u>वाचा</u>:- १) शासन निर्णय, क्र-मत्स्यवि-१०६४/७००७(१)-ग,दिनांक.१६-४-१९६९.
२) शासन निर्णय, क्र.मत्स्यवि-२८७०/१५०५७/ग,दिनांक.२०-१२-१९७१.
३) शासन निर्णय, क्र-मत्स्यम-१०८१/६३१५/१२,पदुम,दिनांक.१६-१२-१९८१.

प्रस्तावितः-

उपरिनिर्दिष्ट शासन निर्णयाद्वारे सध्या मच्छिमारांना सागरी व देशांतर्गत (भूजलशयीन) मासेमारीसाठी लागणाऱ्या नायलॉन सुतावर व मोनोफिलॅमेन्टवर अनुदान देण्यांत येते. तथापि हल्ली बाजारात काही कंपन्याची तयार जाळी विकत मिळू लागल्यामुळे सूत खरेदी करुन जाळी विणून वापण्यापेक्ष तयार जाळी विकत मिळू लागल्यामुळे सूत खरेदी करुन जाळी विणून वापरण्यापेक्षा तयार जाळी खरेदी करणे बहुतेक मच्छिमार अधिक पसंत करतात. त्यामुळे जाळी बनविण्यासाठी जो वेळ खर्ची पडतो तो वाचून तेवढा जास्त वेळ त्यांना मच्छिमारीसाठी मिळू शकतो. मच्छिमार व त्यांच्या सहकारी संस्था यांचेकडून तयार जाळयांवर अनुदान देण्याबाबत शासनाकडे मागणी करण्यांत आली होती व ती काही दिवसांपासून शासनाच्या विचाराधीन होती.

निर्णयः-

मच्छिमारांना त्यांच्या इच्छेनुसार व गरजेनुसार नायलॉन सुतावर व मोनोफिलॉमेंट किंवा नायलॉन व मोनोफिलॉमेटची तयार जाळी विकत घेता यावी म्हणून शासन आता असे आदेश देत आहे की, मच्छिमारांना नायलॉन व मोनोफिलॉमेंटच्या तयार जाळयावरही अनुदान देण्यांत यावे. हे अनुदान शासनमान्य उत्पादकाकडून खरेदी केलेल्या जाळयावर देण्यांत यावे. तसेच ही जाळी सध्याच्या उत्पादकाकडून खरेदी केलेल्या जाळयावर देण्यांत यावे. तसेच ही जाळी सध्याच्या पध्दतीनुसार मच्छिमारांनी त्यांच्या सहकारी संस्थामार्फत खरेदी केलेली असावीत. अनुदान मंजुरीच्या इतर अटी व शर्ती पूर्वीप्रमाणे तशाच राहतील. अनुदानाचे प्रमाण खालील प्रमाण राहील:-

| मच्छिमारीचा प्रकार | तयार जाळयावर अनुदानाचे प्रमाण | कमाल मर्यादा |
|---|---|---|
| १) देशांतर्गत (भूजलशयीन) | जाळयाच्या किंमतीच्या ५० टक्के परंतु ५ किलो सुताच्या ५० टक्के पेक्षा जास्त नाही. | प्रत्येक मच्छिमाराला प्रतिवर्षी ५ किलोपर्यंत मर्यादित. |
| २) सागरी | जाळयाच्या किंमतीच्या १५ टक्के परंतु ३ मे. टनावरील नौकेसाठी १०० कि.ग्रॅ/सुताच्या किंमतीच्या १५ टक्के पेक्षा जास्त नाही. | ३. मे टनावरील प्रत्येक नौकेस १०० कि.ग्रॅ. व ३ मे.टनावरील प्रत्येक नौकेस ५० कि.ग्रम. प्रतिवर्षी. |
| ३) ३ मे.टनाखालील नौकेसाठी ५० कि.ग्रॅ. | मे.टनावरील नौकेसाठी १०० कि.ग्रॅ.सुताच्या किंमतीच्या १५ टक्के पेक्षा जास्त नाही. | ३.मे टनाखालील प्रत्येक नौकेस ५० कि.ग्रॅम प्रतिवर्षी. |

२. हे आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

३. सदर अनुदानासाठी येणारा खर्च मागणी क्र.६५-२४०५,मत्स्यव्यवसाय-८०० इतर खर्च-८०० (दोन) (एक) मत्स्यव्यवसायाकरिता आवश्यक साधनांचा पुरवठा (२४०५ ०४४२) या अर्थशीर्षाखाली खर्च टाकण्यात यावा व त्या शीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०८७/व्यय-१,दिनांक २२-९-१९८७ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श.तु.चव्हाण),
कार्यासन अधिकारी,
कृषि व सहकार विभाग.

प्रति,
मत्स्यव्यवसाय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई-२.
सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ,
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती,
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई/ठाणे(पालघर), रायगड अलिबाग/रत्नागिरी/सिंधुदुर्ग (मालवण)/भंडारा/चंद्रपूर.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई
उपकोषागार अधिकारी, पालघर (जि.ठाणे, मालवण) (जि.सिंधुदुर्ग)

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
नियोजन विभाग,(पीआरजी-५).
वित्त विभाग(व्यय-१),
निवड नस्ती